भारत पेट्रोलियमचे अधिकृत विक्रेते
Bharat Petroleum · Pure for Sure · Pure and Sure
विरा पेट्रोलियम
सर्व प्रकारचे डेबीट कार्ड आणि क्रेडीट कार्ड स्वीकारले जातील.
उपलब्ध सुविधा
✓ २४ तास पेट्रोल- डिझेलची सेवा
✓ वाहन पार्कीगसाठी सुसज्ज व्यवस्था
✓ वाहनांसाठी हवा भरण्याची व्यवस्था
✓ पिण्यासाठी फिल्टरचे थंडपाणी
✓ प्रसाधनासाठी स्वच्छ व्यवस्था
विरा पेट्रोलियम
ठिकाण : कोल्हार-लोणी रोड, प्रवरानगर फाटा जवळ, ता. राहाता, जि. अ. नगर
9511356789
विश्वसनीय सेवा, शुद्ध इंधन आणि ग्राहकांचा विश्वास...! | विरा पेट्रोलियम - तुमच्या वाहनाची खरी काळजी

सत्याची बाजू, जनतेचा आवाज!

साप्ताहिक

# नगरी समाचार

PRG NO. MHMAR/26/A5926

संपादक : लखन गव्हाणे

विश्वास मोठ्या कंपन्यांचा, सोलर सोल्यूशन एकच!
RAGHAV ENTERPRISES
विश्वास • गुणवत्ता • सेवा
आम्ही वापरतो फक्त भरोसात्मक ब्रँड्स
vikram · adani Solar · Premier · WAAREE · TATA · UTL SOLAR
गुणवत्तेची 100% हमी
सोलर लावा, भविष्य उज्ज्वल बनवा!
आजच संपर्क करा!
शैलेश आहेर 9922339908
राहुल धस 9767243842
raghaventerprises1412@gmail.com
गुणवत्ता आमची ओळख, समाधान तुमचा हक्क!

वर्ष १ रे | अंक नं.१२ | पाने ४ | शनिवार, दि. ०३ ऑक्टोंबर २०२६ | किंमत ३ रुपये

# ग्रामीण खेळाडू जिद्दीने इतिहास घडवतात : ना. विखे पाटील

## जिल्ह्याचा भूमिपुत्र अस्लम इनामदारचा लोणीत सत्कार सलग दुसऱ्यांदा पटकावले सुवर्णपदक

**प्रतिनिधी। नगरी समाचार**

**लोणी :** आशियाई क्रीडा स्पर्धेत कबड्डी खेळात दुसऱ्यांदा सुवर्णपदक मिळविलेल्या अहिल्यानगरचा भूमिपुत्र अस्लम इनामदार याची खेळातील कारकीर्द सुवर्णविजयी आणि सर्वांसाठी प्रेरणादायी असल्याची प्रतिक्रिया जलसंपदा तथा पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांनी व्यक्त केली.

श्रीरामपूर तालुक्यातील टाकळीभानचा भूमिपुत्र अस्लम इनामदार याने आशियाई क्रीडा स्पर्धेत कबड्डी संघामध्ये प्रतिनिधित्व करून सलग दुसऱ्यांदा सुवर्णपदक पटकावण्याचा मान मिळविला आहे. मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी अस्लम इनामदार याचा लोणी येथे सत्कार करून त्याचे विशेष अभिनंदन केले.

या प्रसंगी प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुस्मिता विखे पाटील, जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरंगे यांच्यासह अस्लमचे नातेवाईक आणि ग्रामस्थ उपस्थित होते.



सातत्यपूर्ण सरावाच्या बळावर क्रीडा क्षेत्रात अस्लम इनामदार आणि त्याच्या संघाने भारताचा तिरंगा अभिमानाने फडकवला. हे यश अहिल्यानगरच्या क्रीडा संस्कृतीचे, त्याच्या कुटुंबीयांचे आणि प्रशिक्षकांचे आहे. अहिल्यानगरचा भूमिपुत्र आशियाच्या मैदानावर इतिहास घडवतो, ही सर्वांच्या दृष्टीने अभिमानास्पद घटना आहे, असे विखे पाटील म्हणाले.

ग्रामीण भागातील खेळाडू आपल्या मेहनतीने आणि जिद्दीने नावलौकिक मिळवत असल्याचे सांगून, यापूर्वी अस्लमला प्रथम सुवर्णपदक मिळाले तेव्हा टाकळीभान येथे त्याच्या नागरी सत्कार समारंभास आपण आवर्जून उपस्थित होतो, अशी आठवण त्यांनी सांगितली. अस्लमचे यश हे जिल्ह्यातील खेळाडूंसाठी अतिशय प्रेरणादायी असल्याचे त्यांनी नमूद केले.

अनेक खेळाडू जिल्ह्यातून विविध स्पर्धांत सहभागी होत आहेत. शहर आणि ग्रामीण खेळाडूंमधील दरी आता कमी होत आहे. योग्य संधी, प्रशिक्षण आणि प्रोत्साहन मिळाले तर राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर खेळाडू देशाचे नाव उज्वल करू शकतात, हा आत्मविश्वास अस्लम इनामदार याच्या यशाने सर्वांना दिला आहे, असेही मंत्री विखे पाटील म्हणाले.

# पुण्यातील पत्रकार हल्ल्याचे श्रीरामपुरात तीव्र पडसाद

## आरोपींवर कठोर कारवाईची मराठी पत्रकार संघाची मागणी



**प्रतिनिधी। नगरी समाचार**

**श्रीरामपूर :** पुणे येथील नवी पेठेत 'जय महाराष्ट्र' वृत्तवाहिनीचे पुणे प्रतिनिधी निखिल सुक्रे यांच्यावर झालेल्या भ्याड हल्ल्याचे तीव्र पडसाद आता राज्यभर उमटू लागले असून, श्रीरामपूरमध्येही या घटनेचा तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. या हल्ल्याच्या निषेधार्थ श्रीरामपूर येथील पत्रकार संघटना आक्रमक झाल्या असून, आरोपींवर 'पत्रकार संरक्षण कायद्या'अंतर्गत तत्काळ आणि कठोर कारवाई करण्यात यावी, अशी जोरदार मागणी करण्यात आली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, १ ऑक्टोबर रोजी सायंकाळी पुण्यात अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या वतीने स्पर्धा परीक्षांच्या प्रश्नांवर आंदोलन सुरू होते. या आंदोलनादरम्यान आमदार रोहित पवार यांनी भेट दिली असता, त्याचे वृत्तांकन करण्यासाठी गेलेले पत्रकार निखिल सुक्रे यांच्यावर आ. रोहित पवार यांच्या समर्थकाकडून भ्याड हल्ला करण्यात आला.

या घटनेचे वृत्त वाऱ्यासारखे पसरताच पत्रकार क्षेत्रातून संतापाची लाट उसळली. या घटनेचा निषेध नोंदवण्यासाठी श्रीरामपूर मराठी पत्रकार संघ आणि डिजिटल मीडिया पत्रकार संघाच्या वतीने आज श्रीरामपूरचे अपर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाकचौरे यांची भेट घेऊन त्यांना एक सविस्तर निवेदन देण्यात आले. श्रीरामपूर मराठी पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष प्रदीप आहेर यांच्या नेतृत्वाखाली हे निवेदन सुपूर्द करण्यात आले. निवेदन देताना पत्रकारांनी आपली भूमिका स्पष्ट करत प्रशासनाला सज्जड इशारा दिला. प्रसार माध्यमांच्या प्रतिनिधींवर होणारे हल्ले म्हणजे थेट लोकशाहीवर केलेला हल्ला आहे. निखिल सुक्रे यांच्यावर हल्ला करणारा व्यक्ती आमदार रोहित पवार यांचा समर्थक असो किंवा इतर कोणीही, त्याच्यावर कायद्याचा बडगा उगारलाच पाहिजे.

पत्रकारांवरील असे भ्याड हल्ले यापुढे अजिबात खपवून घेतले जाणार नाहीत, अशी ठाम भूमिका पत्रकार संघटनांनी मांडली. याप्रसंगी श्रीरामपूर मराठी पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष प्रदीप आहेर, उपाध्यक्ष महेश रक्ताटे, कार्याध्यक्ष ॲड. बाळासाहेब आगे, ज्येष्ठ पत्रकार नागेशभाई सावंत, सचिव सुरेश कंगुणे, संघटक जयेश सावंत, सुधीर लोळगे, अस्लम बिनसाद, इमरान शेख, इनायत अत्तार, अमोल साबणे, शोहेब शाह, राजेंद्र सूर्यवंशी यांच्यासह पत्रकार संघटनेचे अनेक पदाधिकारी आणि सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. या सर्वच पत्रकारांनी एकजुटीने हल्लेखोरांवर लवकरात लवकर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली.

# बेग आणि जेधे टोळीवर मकोकाअंतर्गत कारवाईच्या मागणीसाठी श्रीरामपुरात आमरण उपोषण



**प्रतिनिधी। नगरी समाचार**

**श्रीरामपूर :** बेग आणि जेधे टोळीवर संघटित गुन्हेगारी कायद्यान्वये अर्थात मकोका अंतर्गत कारवाई करण्यात यावी, या मागणीसाठी सकल हिंदू समाज आणि श्रीरामपूरकरांच्या वतीने महात्मा गांधी चौकात आज, महात्मा गांधी जयंतीच्या दिवशी, बेमुदत आमरण उपोषणाला सुरुवात करण्यात आली. जोपर्यंत संबंधित टोळ्यांवर मकोकाअंतर्गत कारवाई होत नाही, तोपर्यंत उपोषण मागे घेतले जाणार नाही, असा इशारा आंदोलकांनी दिला आहे.

श्रीरामपूर शहरात सुमारे अडीच महिन्यांपूर्वी युवा हॉटेल व्यावसायिक आकाश दुबैय्या यांची भरदिवसा हत्या झाल्याची घटना घडली होती.

या घटनेच्या निषेधार्थ नागरिकांनी संताप व्यक्त करत संपूर्ण शहर सलग चार दिवस बंद ठेवले होते. तसेच या घटनेच्या निषेधार्थ भव्य मोर्चाही काढण्यात आला होता.

या आंदोलनादरम्यान पोलिस प्रशासनाकडून संबंधित गुन्हेगारी टोळ्यांवर मकोका कायद्यांतर्गत कारवाई करण्याचे लेखी आश्वासन देण्यात आल्याचे आंदोलकांचे म्हणणे आहे. मात्र, या आश्वासनाची अद्याप पूर्तता झालेली नसल्याने नागरिकांमध्ये नाराजी निर्माण झाली असून, त्यातून आमरण उपोषणाचा निर्णय घेण्यात आला आहे. हिंदुत्ववादी नेते प्रकाश चित्ते यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन सुरू आहे.

विशेष म्हणजे, राजकीय मतभेद बाजूला ठेवून तालुक्याचे आमदार हेमंत ओगले आणि नगराध्यक्ष करण ससाणे यांनीही आंदोलनात सहभाग नोंदविला.

दरम्यान, शहरातील कायदा व सुव्यवस्था, नागरिकांची सुरक्षितता आणि संघटित गुन्हेगारीविरोधातील कारवाईचा मुद्दा या आंदोलनातून पुन्हा ऐरणीवर आला आहे.

बेग आणि जेधे टोळीवर मकोकाअंतर्गत कारवाई होईपर्यंत आमरण उपोषण मागे घेतले जाणार नाही, असा ठाम इशारा आंदोलकांनी प्रशासनाला दिला आहे.

# सगळं आपल्यालाच मिळावं या हव्यासापोटी जिल्हा बँकच काय उद्या मतदारसंघात गणपती मंडळाची निवडणूक लढवतील : आ. रोहित पवार

## जिल्हा बँक उमेदवारी अर्ज खरेदीवरून पवारांनी काढली राम शिंदेंची बौद्धिक पातळी

**प्रतिनिधी। नगरी समाचार**

**कर्जत :** राजकारणात सगळं आपल्यालाच मिळावं या हव्यासापोटी आपले विरोधक जिल्हा बँकच काय उद्या मतदारसंघात गणपती मंडळाची निवडणूक लागली तरी कायदा बदलत निवडणूक लढवू शकते असा घणाघात आमदार रोहित पवार यांनी विधान परिषदेचे सभापती राम शिंदे यांना सोशल मीडियावर लगावला. बुधवारी राम शिंदे यांनी जिल्हा बँकेच्या निवडणुकीसाठी आपला उमेदवारी अर्ज खरेदी केला होता. त्यावर आमदार पवारांनी राम शिंदेंना टोला लगावला. सोशल मीडियावरील या पोस्टने कर्जत-जामखेडमध्ये पुन्हा एकदा दोन्ही बाजूंच्या कार्यकर्त्यांमध्ये सोशल वार रंगला.

सध्या जिल्हा बँकेच्या निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर झाला असून उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या प्रक्रियेस सुरुवात देखील झाली. राम शिंदे यांच्या नावाचा कर्जत आणि जामखेड या दोन्ही तालुक्यात ठराव असून त्यांच्या राजकीय महत्वकांक्षेवरून त्यांनी जिल्हा बँक लढविण्याचे सूतोवाच केले होते. बुधवारी राम शिंदे यांनी स्वता जात आपल्यासाठी उमेदवारी अर्ज खरेदी केला होता. तोच धागा पकडत आमदार रोहित पवार यांनी गुरुवारी सकाळी आपल्या सोशल मीडियाच्या खात्यावरून राम



शिंदेंना लक्ष्य केले. राजकारणात सगळं आपल्यालाच मिळावं या हव्यासापोटी तीन अपत्ये असताना विधान परिषदेचे सभापती राम शिंदे अहिल्यानगर जिल्हा बँकेच्या निवडणुकीसाठी गुडघ्याला बाशिंग बांधून बसलेत. वास्तविक पाहता विधान परिषदेसारख्या कायदे-मंडळाच्या वरिष्ठ सभागृहाच्या सभापतींनाच कायदे-नियम माहित नसतील तर याला काय बोलावं ? असा सवाल उभा केला. खरं पाहता त्यांची बौद्धिक क्षमता मला माहित असल्याची बोचरी टीका केली.

कर्जत-जामखेडमध्ये केवळ मला विरोध करण्यासाठी आणि मतदारसंघात आपल्याला गुंतवून ठेवण्यासाठी त्यांना पद देण्यात आले आहे. हे कटू सत्य ते देखील नाकारणार नाहीत. पण त्या व्यक्तीस त्या पदाची गरिमा आणि साधे कायदे-नियम माहित नसणे याची शोकांतिका वाटते. अशा व्यक्तीला सभापती पदावरून तातडीने हटवून गणपती मंडळाच्या किंवा स्थानिक उत्सव मंडळाच्या निवडणुकीत सहभागी होण्यासाठी मुक्त करावं असा सल्ला दिला. जेणेकरून सभापती पदासारख्या प्रतिष्ठेच्या पदाची अप्रतिष्ठा आणि महाराष्ट्राचं नुकसान होणार नाही अशी मागणी भाजपाच्या वरीष्ठांना केली. एकतर सगळीकडेच राम शिंदे यांच्या नावाचाच झेंडा लावला जात असेल तर भाजपच्या कार्यकर्त्यांची अवस्थाही 'हाथ खाली और बजाओ ताली असा मिश्किल टोला देखील लगावला. त्यामुळे अशा व्यक्तीस सभापती पदावरून हटवून किमान कायद्याची जाण आणि पदाची गरिमा राखणाऱ्या हुशार आमदाराला तरी या पदावर काम करण्याची संधी मिळेल अशी आशा शेवटी व्यक्त केली.

### रोहित पवारांच्या पोस्टने रंगला कार्यकर्त्यांमध्ये सोशल वार

रोहित पवारांच्या वरील पोस्टने कर्जत-जामखेडच्या दोन्ही नेत्यांच्या सर्वसामान्य कार्यकर्त्यांमध्ये चांगलाच सोशल वार सुरू झाला आहे. भाजपाचे जिल्हा सरचिटणीस शेखर खरमरे यांनी आमदार रोहित पवार यांची गत सध्या येऊ नको तर कोणत्या गाडीत बसू अशी झाली असल्याची टीका केली. तर राष्ट्रवादी काँग्रेस शपचे सुधीर यादव यांनी गणपती बाप्पा मोरया मंडळाच्या अध्यक्षपदी निवड कर्जत-जामखेड अशी पोस्ट टाकत चिमटा घेतला.

# मुलांच्या वाचनाला, ज्ञानाला आणि कल्पनाशक्तीला नवी दिशा!

**इयत्ता १ ली ते ५ वीच्या विद्यार्थ्यांसाठी चार विशेष आणि उपयुक्त पुस्तके**

आजच्या डिजिटल युगात मुलांना मोबाईल आणि टीव्हीपासून दूर ठेवून त्यांच्या हातात दर्जेदार, मनोरंजक आणि ज्ञानवर्धक पुस्तक देणे अत्यंत महत्त्वाचे आहे. हीच गरज लक्षात घेऊन -ख पब्लिकेशन्सच्या माध्यमातून इयत्ता पहिली ते पाचवीपर्यंतच्या मुलांसाठी चार सुंदर आणि उपयुक्त पुस्तके प्रकाशित करण्यात आली आहेत. या पुस्तकांमध्ये मुलांच्या वयाचा, आकलनशक्तीचा आणि वाचनाच्या सवयींचा विचार करून सोप्या भाषेचा, छोटी-छोटी वाक्ये आणि आकर्षक मांडणीचा वापर करण्यात आला आहे. त्यामुळे मुलांना पुस्तके वाचणे सोपे जाईल आणि वाचनाची आवड निर्माण होण्यास मदत होईल.




**आजच आपल्या मुलांसाठी ही चारही पुस्तके उपलब्ध करून द्या.**

१) मराठी - मनोरंजक गोष्टी
२) हिंदी बच्चों की मजेदार कहानियाँ
३) English Story Box
४) Maths The Magic Of Maths

**१) मराठी मनोरंजक गोष्टी**

मुलांसाठी खास तयार केलेल्या ४० रंजक मराठी गोष्टींचा हा सुंदर संग्रह आहे. गोष्टी मनोरंजक असण्याबरोबरच मुलांना चांगले विचार, संस्कार, सकारात्मक दृष्टिकोन आणि जीवनातील छोट्या-छोट्या गोष्टी समजून घेण्यास मदत करतील अशा पद्धतीने निवडण्यात आल्या आहेत. मुलांना सहज समजेल अशी सोप्या मराठी भाषेतील मांडणी, छोटी-छोटी वाक्ये आणि वाचण्यास सुलभ मजकूर हे या पुस्तकाचे विशेष वैशिष्ट्य आहे. पालकांनी मुलांना गोष्टी वाचून दाखवण्यासाठी तसेच मुलांनी स्वतः वाचन करण्यासाठी हे पुस्तक उपयुक्त ठरू शकते.

**२) हिंदी बच्चों की मजेदार कहानियाँ**

हिंदी भाषेची गोडी निर्माण करण्यासाठी आणि मुलांच्या वाचन कौशल्याला चालना देण्यासाठी ३५ मजेदार हिंदी कहानियाँ या पुस्तकात समाविष्ट करण्यात आल्या आहेत.



**लेखिका : वैष्णवी अमोल फटांगरे**
**पब्लिकेशन्स - AI पब्लिकेशन्स**
**अनमोलवाणी प्रकाशन**
**एकूण ४ पुस्तके**
**किंमत ४८६ रू**
**ऑफर ३४९ रू**
**मो. ७०३९०१६०६०**

सरल और आसान हिंदी भाषा, छोटे-छोटे वाक्य और रोचक कहानियाँ बच्चों को पढ़ने में आसानी और आनंद देती हैं। मनोरंजन के साथ-साथ बच्चों को अच्छी बातें, सकारात्मक विचार और जीवनमूल्य समझाने का प्रयास इस पुस्तक के माध्यम से किया गया है।

**३) ENGLISH - STORY BOX**

English reading ची सुरुवात करणाऱ्या मुलांसाठी Story Box हे विशेष पुस्तक आहे. या पुस्तकात मुलांना आवडतील अशा २५ ळपींशीर्शीीळपस रपव ाशरपळपसर्षीश्र ींीळशी देण्यात आल्या आहेत. Stories are written in simple and easy English with short sentences, making them easier for young learners to read and understand. This book can help children develop their English reading habit, vocabulary and confidence while enjoying interesting stories.

**४) MATHS THE MAGIC OF MATHS**

गणित हा विषय मुलांना अवघड किंवा कंटाळवाणा वाटू नये, यासाठी The Magic Of Maths हे पुस्तक तयार करण्यात आले आहे. या पुस्तकामध्ये मुलांना गणिताची प्राथमिक ओळख सोप्या आणि आनंददायी पद्धतीने करून देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. गणितातील मूलभूत संकल्पना समजून घेण्यासाठी आणि गणिताकडे सकारात्मक दृष्टिकोन निर्माण करण्यासाठी हे पुस्तक उपयुक्त ठरू शकते.

*** या चारही पुस्तकांची वैशिष्ट्ये**

इयत्ता १ ली ते ५ वीच्या मुलांसाठी उपयुक्त
मुलांना समजेल अशी सोप्या भाषेतील मांडणी
छोटी-छोटी वाक्ये, त्यामुळे वाचनास सोपे
मनोरंजनासोबत ज्ञान आणि चांगल्या मूल्यांची सांगड
मुलांच्या वाचनाची सवय विकसित करण्यास उपयुक्त
मराठी, हिंदी, इंग्रजी आणि गणित या चारही क्षेत्रांचा समावेश
दर्जेदार आणि आकर्षक पृष्ठरचना
मुलांच्या वयाचा आणि आकलनाचा विचार करून तयार केलेली पुस्तके

**मुलांच्या हातात मोबाईल नव्हे, पुस्तक द्या!**

वाचनाची सवय ही मुलांच्या उज्ज्वल भविष्यासाठीची पहिली पायरी आहे. चार पुस्तके - चार वेगवेगळे अनुभव मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी एक सुंदर प्रयत्न !

# त्या काळी अतिभव्य असलेल्या गडाचे अनेक भाग आपणास अवशेषाच्या रूपात पाहायला मिळतात व त्यातीलच पण सुस्थितीत बऱ्याच प्रमाणात चांगली व सुंदर वास्तू म्हणजे नगारखाना

नगार खाण्याचे महत्त्वच अगणितआहे सिंहासनासमोर सुमारे ५०-५५ मीटर(२०० फुट ) अंतरावर राजसभेचे प्रवेशद्वार किंवा नगारखाना गडावरील सर्वात उंच ठिकाण एकूण उंची ५० फूट व रुंदी २० फूट असून कमानीची उंची जमिनीपासून सुमारे दहा मीटर व रुंदी आठ मीटर आहे.

नगार खाण्याकडे तोंड करून उभे राहिल्यास डावीकडील भिंतीमधून नगारखान्याच्या गच्चीवर जाण्यासाठी एक जिना आहे सिंहासनापासून नगर खाण्यापर्यंत २०० फुटाचे अंतर असून देखील सिंहासनाजवळ उभे राहून हळू हळू आवाजात बोलले तरी प्रवेशद्वारापर्यंत स्पष्ट ऐकू येते

हा बांधकाम कलेचा एक उत्कृष्ट नमुनाच आहे व गडावरील वैशिष्ट्य देखील

गडावरील पंचधातूची प्रशस्त मेघडंबरी हे या ठिकाणचे खास आकर्षण आहे मेघडंबरी म्हणजे शिवछत्रपतींच्या सिंहासनाची जागा येथेच ३२ मण वजनाचे सुवर्ण सिंहासन राज्याभिषेकाच्या वेळी मांडण्यात आले होते असे म्हणतात या पवित्र स्थानावरून त्यावेळी सहा पवित्र नद्या व सातही सागरांचे तीर्थ जल वाहिले होते शिवछत्रपती सिंहासना धी ईश्वर झाले आणि पुन्हा एकदा स्वातंत्र्य सूर्य उगवला तो येथेच शासनाने या जागी १९८५ रोजी मेघडंबरी उभारली आहे हे सर्व नगारखान्याचा व मेघडंबरीचे सौंदर्य डोळ्यात साठवून आपण नगर खाण्याकडे पाठ करून समोर खाली पूर्वे कडे पठार आहे तिथूनच सुमारे ३० मीटर खाली वाघ दरवाजा आहेया दरवाजाने वर चढणे अशक्यप्राय आहे दोर बांधून खाली उतरणे शक्य आहे हा दरवाजा गडावरून सहीसलामत निसटून जाण्याचा एक सुरक्षित मार्ग असावा



गडावर शिर्काई देवीचे मंदिर आहे ही देवी गडावरील मुख्य देवता आहे शिरकाई हे नाव कदाचित शिर्क्यांची कुलदेवता म्हणून पडले असावे रायगड हा कधीकाळी शिर्के यांच्या स्वाधीन होता तेव्हा त्यांनी या गडावर आपल्या कुलदेवतेची स्थापना केली असावी पण मूर्ती अष्टभुजा आई तुळजाभवानीची आहे

गडावर दोन तलाव आहेत एक कोरडा हत्ती तलाव व दुसरा गंगासागर तलाव बालेकिल्ल्याकडे जाताना किंचित वर गेल्यावर एक पाण्याचा तलाव लागतो तो म्हणजे गंगासागर तलाव या तलावात वर्षभर पाणी असते शिवरायांच्या राज्याभिषेकासाठी आणलेल्या सप्तसागर आणि सप्त महा नद्या यांची तीर्थ अभिषेकानंतर यात टाकण्यात आली म्हणून याला गंगासागर म्हणू लागले असा कयास आहे

किल्यावर अनेक स्तंभ आहेत लोहस्तंभ जय स्तंभ आणि विजय स्तंभ हा त्यापैकी एक गंगासागराच्या मागील बाजूस दोन उंच मनोरे असून वरील बरेचसे बांधकाम कोसळले आहेत त्याचा पाया द्वादशकोनी आहे व त्यास प्रत्येक बाजूस खिडक्या आहे या मनोर्याचे (कीर्ती स्तंभ )बांधकाम फार सुशोभित असून त्याने बालेकिल्ल्याच्याशोभेत अपूर्व भर टाकली आहे

या किल्ल्यात होळीच्या मा ळा समोरील चाळीस फूट रुंद रस्त्यांच्या दुतर्फा बावीस बावीस जोत्यांची रांगच रांग दिसते आजवर या वास्तू समूहास बाजारपेठ असे म्हणतात ओट्याची उंची घोड्यावर बसून बाजार खरेदी करता येईल इतकी आहे

बाजारपेठ मागे टाकून पूर्वे कडे तोडे वळून निघाल्यास समोर एका तटबंदीच्या आत देवळाचा कळस दिसू लागतो तेच जगदीश्वराचे मंदिर हे मंदिर महादेवाचे आहे मंदिरासमोरील नंदी ची मूर्ती भव्य व सुबक आहे सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे जगदीश्वराच्या मंदिराच्या जवळच हिंदवी स्वराज्य संस्थापक हिंदुधर्मरक्षक छत्रपती श्री शिवाजी महाराज यांची समाधी आहे समाधी परिसर दिसायला भव्य व रम्य असाच आहे समाधीच्या डावीकडे वाघ्या कुत्र्याची समाधी तर उजवीकडे जगदीश्वर मंदिर आहे किल्ल्याला टकमक टोक आहे याची उंची बाराशे पन्नास फूट आहे येथून गडाखालचे असे काही रौद्र रम्य दृश्य दिसते की सांगता पुरवत नाही येथूनच कडेलोटाची शिक्षा दिली जात

किल्ल्यावर महारा जांचा भव्य दिव्य व आकर्षक सिंहासनाधीश्वर पुतळा आहे याची स्थापना सन १९७४ ला जेव्हा शिवछत्रपतींच्या राज्याभिषेक सोहळ्याला तीनशे वर्षे पूर्ण झाली तेव्हा या पुतळ्याची होळीच्या माळावर स्थापना करण्यात आली प्रशस्त रायगड आणि तेथील विविध ठिकाणे याची माहिती घेऊन पहायची म्हटली तर एक दिवसही पुरणार नाही

असा हा स्वराज्याचा मेरुमणी रायगड गडप्रेमी ,इतिहास प्रेमींचे लक्ष वेधून घेण्यात अग्रेसर आहे गड प्रत्यक्ष हिंडून पाहिल्यावर गडाच्या भव्य कल्पना येते आता इतका वैभवशाली वाटतो तर तो त्या काळी किती देखना व भव्य असेल याची कल्पना येते .दमछाक करणारी चढण चढून न जाता गडावर जाण्यासाठी रोप-वेची हि सुविधा आहे परंतु खरी मजा अवघड चढण चढून जाण्यात आहे या गडाला शिवप्रेमी ने जीवनात एकदा तरी भेट द्यावी



लेखक
**साईप्रसाद प्रमोद कुंभकर्ण**
संपर्क : ९०११८९०२७९

# ताराबाई भाऊराव विखे पाटील यांचे निधन

**प्रतिनिधी। नगरी समाचार**

**लोणी बुद्रुक :** येथील कैलासवासी ताराबाई भाऊराव विखे यांचे शुक्रवारी रात्री ८.३० वाजता हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनाने विखे कुटुंबीय, नातेवाईक आणि परिसरातील नागरिकांमध्ये शोककळा पसरली आहे.

कैलासवासी ताराबाई विखे या पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील सहकारी साखर कारखान्याचे माजी चेअरमन स्वर्गीय संपतराव बापूनाना कडू पाटील यांच्या भगिनी होत. तसेच त्या राज्याचे जलसंपदा मंत्री तथा अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या चुलती होत.



ताराबाई विखे या लोणी ग्रामपंचायतीचे सदस्य प्रवीण विखे व सचिन विखे यांच्या मातोश्री होत. त्यांच्या निधनाची वार्ता समजताच विखे व कडू कुटुंबीय, नातेवाईक, ग्रामस्थ तसेच परिसरातील नागरिकांनी दुःख व्यक्त केले. त्यांच्या प्रेमळ आणि मनमिळावू स्वभावामुळे त्यांचा नातेवाईक व परिचितांमध्ये जिव्हाळ्याचा संबंध होता.

त्यांच्या पश्चात तीन मुली, दोन मुले, दोन सुना, नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्या निधनाने विखे कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला असून, लोणी बुद्रुक परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

# भाविकांसाठी लाडू प्रसाद काउंटर सुरू

**प्रतिनिधी। नगरी समाचार**

**शिर्डी :** येथे येणाऱ्या साईभक्तांना अधिकाधिक सुविधा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने श्री साईबाबा संस्थानच्या वतीने नगर-मनमाड महामार्गालगत नव्याने सुरू झालेल्या सबका मालिक एक मार्केट परिसरातील जागेत लाडू प्रसाद काउंटरची सुविधा सुरू करण्यात आली आहे. श्री साईबाबा संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडिलकर यांच्या निर्देशानुसार ही सुविधा सुरू करण्यात आली असून, या लाडू प्रसाद काउंटरचे औपचारिक




उद्घाटन शिर्डी नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा जयश्रीताई थोरात यांच्या हस्ते आज संपन्न झाले. यावेळी उपनगराध्यक्ष अभय शेळके यांच्यासह सर्व नगरसेवक, श्री साईबाबा संस्थानचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी भिमराज दराडे, प्रशासकीय अधिकारी प्रज्ञा महांडुळे, अतुल वाघ, लाडू प्रसाद निर्मिती विभाग प्रमुख रविंद्र गायके तसेच शिर्डी नगरपरिषद व साईबाबा संस्थानचे अधिकारी, कर्मचारी आणि नागरिक उपस्थित होते. नगर-मनमाड महामार्गालगत मुख्य रस्त्यावर ही सुविधा सुरू झाल्यामुळे या मार्गावरून तसेच प्रसादालयाच्या दिशेने ये-जा करणाऱ्या साईभक्तांना लाडू प्रसाद खरेदी करणे अधिक सोयीचे होणार आहे. त्यामुळे मंदिर परिसर, भक्तनिवास व प्रसादालयाकडे जाणाऱ्या भाविकांना प्रसाद खरेदीसाठी अतिरिक्त सुविधा उपलब्ध झाली आहे. भाविकांना साईबाबांचा प्रसाद सहज उपलब्ध व्हावा, त्यांचा वेळ वाचावा आणि शिर्डीतील दर्शन तसेच प्रवास अधिक सुलभ व्हावा, या उद्देशाने सुरू करण्यात आलेल्या या सुविधेबद्दल भाविकांनी समाधान व्यक्त केले आहे. श्री साईबाबा संस्थान आणि शिर्डी नगरपरिषद यांच्या समन्वयातून राबविण्यात आलेला हा उपक्रम भाविकांच्या सुविधेला प्राधान्य देणारा असून, शिर्डीत येणाऱ्या साईभक्तांसाठी उपलब्ध सुविधांमध्ये आणखी एक महत्त्वाची भर पडली आहे.

# शिक्षणाचा दर्जा की केवळ पात्रतेची कागदोपत्री पूर्तता?

## खासगी शाळांतील शिक्षकांसाठी टीईटी अनिवार्य करण्याच्या निर्णयाकडे व्यापक शैक्षणिक सुधारणांच्या दृष्टीने पाहण्याची गरज

शिक्षण हा केवळ रोजगार मिळविण्याचा मार्ग नाही, तर समाजाच्या भवितव्याची पायाभरणी करणारी प्रक्रिया आहे. एखाद्या देशाची आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक प्रगती मोजताना त्या देशातील शिक्षणव्यवस्थेचा दर्जा हा अत्यंत महत्त्वाचा निकष ठरतो. त्यामुळे शिक्षकाची गुणवत्ता, शाळांची उपलब्धता, शिक्षणासाठी होणारी गुंतवणूक आणि विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या संधी या सर्व बाबींचा विचार एकत्रितपणे करणे आवश्यक आहे. या पार्श्वभूमीवर पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांना शिकविणाऱ्या खासगी विनाअनुदानित आणि स्वयंअर्थसहाय्यित शाळांतील शिक्षकांसाठीही शिक्षक पात्रता परीक्षा अर्थात टीईटी अनिवार्य करण्याच्या दिशेने शासनाने सुरू केलेली कार्यवाही महत्त्वाची ठरते.

शिक्षक हा शिक्षणव्यवस्थेचा केंद्रबिंदू आहे. त्यामुळे शिक्षकाला विशिष्ट शैक्षणिक आणि व्यावसायिक पात्रता असणे आवश्यकच आहे. टीईटीच्या माध्यमातून शिक्षकाच्या अध्यापनविषयक मूलभूत क्षमतांची चाचणी घेण्याचा प्रयत्न केला जातो. सरकारी आणि अनुदानित शाळांतील शिक्षकांच्या टीईटी पात्रतेची तपासणी होत असताना खासगी शाळांतील शिक्षकांना त्यातून पूर्णपणे वगळणे ही भूमिका प्रश्नांकित होऊ शकते. विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या शिक्षणाचा अधिकार हा शाळेच्या व्यवस्थापनाच्या स्वरूपावर अवलंबून नसतो. त्यामुळे समान शैक्षणिक निकष असण्यामागील शासनाची भूमिका समजून घेणे आवश्यक आहे.

मात्र, टीईटी अनिवार्य करणे म्हणजे शिक्षणव्यवस्थेतील सर्व प्रश्न सुटले, असा निष्कर्ष काढणेही योग्य ठरणार नाही. आज महाराष्ट्रात शिक्षक भरती आणि बेरोजगारी हा मोठा प्रश्न आहे. पात्र शिक्षकांची संख्या वाढत असताना नियमित शिक्षक भरतीची प्रक्रिया अपेक्षेप्रमाणे होत नसेल, तर डीएड आणि बीएड महाविद्यालयांमध्ये प्रवेश घेण्याबाबत तरुणांमध्ये निर्माण होणारी अनिश्चितता स्वाभाविक आहे. अनेक वर्षे शिक्षण घेऊन पात्रता मिळविल्यानंतरही नोकरीची हमी नसणे हा स्वतंत्रपणे विचार करण्याचा विषय आहे.

याच कारणामुळे शिक्षक पात्रता परीक्षा, शिक्षक भरती आणि शिक्षकांच्या सेवाशर्ती या तिन्ही बाबींचा एकत्रित विचार करणे गरजेचे आहे. परीक्षा घेऊन पात्र ठरविणे आणि त्यानंतर रोजगाराच्या संधी निर्माण करणे, यामध्ये सुसंगती नसेल तर तरुणांच्या अपेक्षा आणि शासनाचे धोरण यांच्यात दरी निर्माण होते.

खासगी शाळांबाबतही हा प्रश्न अधिक संवेदनशील आहे. खासगी शिक्षणसंस्था वाढत असताना त्यामध्ये काम करणाऱ्या शिक्षकांच्या सेवा अटी, वेतन, कामाचे तास, नियुक्ती प्रक्रिया आणि नोकरीची सुरक्षितता याबाबत सातत्याने चर्चा होत असते. शासनाने शिक्षकांची पात्रता तपासण्याबरोबरच त्यांच्या हक्कांचे संरक्षण करण्याची जबाबदारीही स्वीकारली पाहिजे. गुणवत्तेच्या नावाखाली केवळ शिक्षकांवर नियम लादणे आणि त्यांच्या सेवाशर्तींकडे दुर्लक्ष करणे ही संतुलित शैक्षणिक धोरणाची भूमिका ठरू शकत नाही.

टीईटीच्या अंमलबजावणीचा आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे त्याची पारदर्शकता. टीईटी किंवा इतर शिक्षक पात्रता परीक्षांमध्ये गैरप्रकार झाल्याच्या आरोपांची चौकशी निष्पक्षपणे झाली पाहिजे. परीक्षेच्या निकालावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले तर त्याचा परिणाम केवळ उमेदवारांवर होत नाही, तर संपूर्ण शिक्षणव्यवस्थेवरील विश्वासावर होतो. त्यामुळे परीक्षा प्रक्रिया तंत्रज्ञानाधारित, पारदर्शक आणि विश्वासार्ह करण्याबरोबरच प्रमाणपत्रांची पडताळणीही प्रभावीपणे झाली पाहिजे.

महाराष्ट्रातील शिक्षणव्यवस्थेसमोर मात्र टीईटीपेक्षा मोठी आव्हाने आहेत. सरकारी शाळांमधील पायाभूत सुविधा, शिक्षकांची उपलब्धता, विद्यार्थ्यांची गळती, ग्रामीण आणि शहरी शिक्षणातील तफावत, डिजिटल साधनांची उपलब्धता, अभ्यासक्रमाचा वाढता भार आणि पालकांवरील खासगी शिक्षणाचा आर्थिक बोजा या प्रश्नांकडेही तितक्याच गांभीर्याने पाहावे लागेल.

एकीकडे काही खासगी शाळा आधुनिक सुविधा आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणाच्या नावाखाली मोठ्या प्रमाणात शुल्क आकारतात, तर दुसरीकडे आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबातील मुलांसाठी उपलब्ध असलेल्या शासकीय योजनांचा प्रत्यक्ष लाभ किती पोहोचतो, याचे मूल्यांकन होणे आवश्यक आहे. शिक्षण हा बाजारपेठेतील केवळ एक व्यवहार बनू नये आणि गरीब विद्यार्थ्यांसाठी गुणवत्तापूर्ण शिक्षणाची दारे बंद होऊ नयेत, याची काळजी शासनाला घ्यावी लागेल.

जागतिक स्तरावर शिक्षणाला विकासाचे प्रमुख साधन मानले जाते. युनेस्कोसह विविध आंतरराष्ट्रीय संस्थांकडून शिक्षणातील सार्वजनिक गुंतवणूक, समान संधी आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणावर सातत्याने भर दिला जातो. या व्यापक दृष्टिकोनातून महाराष्ट्राने शिक्षणासाठी किती गुंतवणूक केली, ती कुठे आणि कशा पद्धतीने वापरली जाते, याचेही सार्वजनिक मूल्यमापन झाले पाहिजे.

सरकारी शाळांकडे पाहण्याची शासनाची दृष्टी बदलण्याची गरज आहे. सरकारी शाळा म्हणजे केवळ गरीब विद्यार्थ्यांची व्यवस्था, असा दृष्टिकोन बदलला पाहिजे. सक्षम पायाभूत सुविधा, प्रशिक्षित शिक्षक, आधुनिक प्रयोगशाळा, ग्रंथालये, क्रीडा सुविधा आणि डिजिटल साधने उपलब्ध करून सरकारी शाळांना गुणवत्तेचे केंद्र बनविणे शक्य आहे. त्यासाठी शिक्षकांवर केवळ जबाबदारी टाकण्याऐवजी त्यांना आवश्यक साधने आणि प्रशिक्षण देणेही तितकेच महत्त्वाचे आहे.

टीईटी अनिवार्य करण्याचा निर्णय त्यामुळे शिक्षकांच्या गुणवत्तेच्या व्यापक धोरणाचा एक भाग म्हणून पाहिला पाहिजे. पात्रता निश्चित करणे आवश्यक आहे; पण त्यासोबत पारदर्शक शिक्षक भरती, नियमित प्रशिक्षण, सन्मानजनक सेवाशर्ती, योग्य वेतन, विद्यार्थीकेंद्री अध्यापन आणि शाळांच्या पायाभूत सुविधांमध्ये गुंतवणूक या बाबीही तितक्याच महत्त्वाच्या आहेत.

शिक्षणाचा दर्जा सुधारायचा असेल तर केवळ शिक्षकाची परीक्षा घेऊन भागणार नाही; शिक्षणव्यवस्थेचीही परीक्षा घ्यावी लागेल. शिक्षक पात्र आहे का, हा प्रश्न महत्त्वाचा आहेच; पण त्याला शिकविण्यासाठी योग्य वातावरण आहे का, विद्यार्थ्याला शिकण्यासाठी समान संधी आहे का आणि शासन शिक्षणाला विकासाच्या केंद्रस्थानी ठेवते का, हे प्रश्न त्याहून महत्त्वाचे आहेत. टीईटीच्या निमित्ताने महाराष्ट्राने या व्यापक प्रश्नांकडे पाहिले, तर हा निर्णय केवळ नियमांची अंमलबजावणी न राहता शिक्षणव्यवस्थेच्या गुणवत्तावाढीच्या दिशेने एक पाऊल ठरू शकतो.

हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक लखन रामनाथ गव्हाणे यांनी मुद्रक कुणाल दशरथ गायकवाड यांच्या अजिंक्य नगरी प्रिंटींग प्रेस,कोल्हार बु।। ता. राहाता -४१३७१० , जि. अहमदनगर (महा.) येथे छापुन शांतिनगर लोणी खु।। ता.राहाता -४१३७१३ , जि. अहमदनगर (महा.) येथे प्रकाशीत केले. संपादकः लखन रामनाथ गव्हाणे, (या वृत्तपत्रात प्रसिध्द झालेल्या वृत्तांशी, मजकुरांशी, लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. मुद्रणदोष संभवणीय. न्यायालयीन वाद राहाता न्यायकक्षेत)

# मुख्यमंत्री फडणवीस यांच्या ऑनलाइन उद्घाटनंतर

## त्रिमूर्तीत रोजगार महाकुंभ मेळावा उत्साहात



**प्रतिनिधी। नगरी समाचार**

**नेवासा :** कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या वतीने आयोजित विश्वविक्रमी रोजगार महाकुंभ मेळाव्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते ऑनलाइन उदघाटन करण्यात आले. कौशल्यातून रोजगार, रोजगारातून समृद्धी! या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संदेशाने रोजगार, कौशल्यविकास आणि आत्मनिर्भरतेचा संकल्प अधिक दृढ झाला.ऑनलाइन उदघाटनानंतर त्रिमूर्ती पावन प्रतिष्ठान संचलित त्रिमूर्ती कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात रोजगार महाकुंभ मेळावाचा प्रत्यक्ष कार्यक्रम उत्साहात पार पडला.

ऑनलाइन उदघाटन कार्यक्रमानंतर अमर जवानांना श्री.योगेश जोशी व मोरे पी.डी.यांनी मानवंदना अर्पण केली. त्यानंतर कर्नल के.पी सिंग आणि श्री योगेश जोशी यांच्या शुभहस्ते प्रत्यक्ष रोजगार महाकुंभ मेळाव्याचे उद्घाटन करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. अशोक गाढे यांनी केले, तर प्रास्ताविक श्री. देवगुडे बी. आर. (शिल्प निर्देशक) श्रयांनी केले. यावेळी महाराष्ट्र शासनाचे माननीय मंत्री श्री. मंगल प्रभात लोढा यांचे विशेष सहाय्यक श्री. योगेश जोशी यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

यावेळी मनोगत व्यक्त करताना योगेश जोशी यांनी युवकांनी उपलब्ध रोजगाराच्या संधींचा लाभ घेत कौशल्यविकासाला प्राधान्य द्यावे, असे आवाहन केले. कौशल्य, रोजगार आणि उद्योजकतेच्या माध्यमातून युवकांना आत्मनिर्भरतेची दिशा मिळू शकते, असे त्यांनी सांगितले.

प्राचार्य डॉ. चांगदेव आरसुळे यांनी आपल्या मनोगतात महाविद्यालयीन युवकांनी शैक्षणिक पात्रतेसोबतच रोजगाराभिमुख कौशल्ये आत्मसात करण्याची गरज व्यक्त केली. रोजगार महाकुंभाच्या माध्यमातून विद्यार्थी व युवकांना विविध कंपन्या आणि रोजगाराच्या संधी एकाच व्यासपीठावर उपलब्ध होत असल्याचे त्यांनी सांगितले.

या रोजगार महाकुंभ मेळाव्यास जवळपास ४०० विद्यार्थी व युवकांनी उत्स्फूर्त उपस्थिती नोंदवली. विविध नामांकित कंपन्यांनी मेळाव्यात सहभाग घेत विद्यार्थ्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्या. यामध्ये सी. पी. एफ. इंडिया, लोखंडे ग्रो, रेणुका माता मल्टीस्टेट, चैतन्य ग्रो, श्रीराम फायनान्स, सचिन ऑटोमोटिव्ह, संत नागेबाबा मल्टीस्टेट, जे.पॅन टुबलर, विजय टेक्नोप्लास्ट, एल टी एच आय टी सोल्युशन प्रा . लि .यांसह विविध कंपन्यांचा सहभाग होता. कंपन्यांच्या प्रतिनिधींनी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक पात्रता, कौशल्ये व क्षमतांनुसार विविध रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिला.

या कार्यक्रमास योगेश जोशी,कर्नल के. पी. सिंग, विधाटे आर. एम. (शिल्प निर्देशक), देवगुडे बी. आर. (शिल्प निर्देशक), श्रीमती मोरे पी. डी. (वरिष्ठ लिपिक), डॉ. चांगदेव आरसुळे,डॉ. अनुराधा गोरे, प्रा.निकिता बर्गे, डॉ.भागवत शुभांगी, प्रा. डमाळे कृष्णा, अशोक गाढे, प्रा. संतोष जावळे, प्रा. विकास साळवे, प्रा. गोरख गुंड, प्रा. अश्विनी औटी, प्रा. ताराचंद विधाटे, प्रा. अनिकेत आरसुळे, प्रा. योगिता गायकवाड, प्रा. प्रवीण आवारे, प्रा.पल्हारे आदी मान्यवर उपस्थित होते.

रोजगार महाकुंभाच्या माध्यमातून युवकांना रोजगार, कौशल्यविकास, उद्योजकता आणि करिअरच्या विविध संधी उपलब्ध झाल्या. विविध कंपन्या आणि विद्यार्थी यांना एकाच व्यासपीठावर आणणारा हा उपक्रम युवकांच्या भविष्याला नवी दिशा देणारा ठरला.यावेळी संस्थेच्या अध्यक्षा ड सुमतीताई घाडगेपाटील, ड स्नेहल घाडगेपाटील, डॉ.श्रुती घाडगेपाटील,चेतनचव्हाणपाटील, गौरव आमलेपाटील यांनी या कार्यक्रमातून मुलांना मिळणाऱ्या रोजगाराबाबत समाधान व्यक्त केले. या मेळाव्यासाठी त्रिमूर्ती बीएड कॉलेज आणि फार्मसी कॉलेज यांचे सहकार्य लाभले.

## दुष्काळी परिस्थिती पंचनाम्यासाठी प्रशासन शेतकऱ्यांच्या बांधावर



**प्रतिनिधी। नगरी समाचार**

**झरेकाठी :** यावर्षी मान्सून पावसाने चांगलीच ओढ दिल्याने खरीप हंगामातील पिकांवर मोठा परिणाम झाला आहे. शासनाकडून दुष्काळसदृश्य परिस्थिती जाहीर करून उपाययोजना सुरू करण्यात आल्या असून या पार्श्वभूमीवर संगमनेर तालुक्यातील झरेकाठी, व शेजारील खळी, चनेगाव,दाढ बुद्रुक परिसरात शेतकऱ्यांच्या पिक नुकसानीच्या पंचनाम्यांस प्रत्यक्ष सुरुवात झाली आहे. भर उन्हात प्रशासन शेतकऱ्यांच्या बांधावर प्रत्यक्ष जात माहिती गोळा करीत आहे.

ग्राम महसूल अधिकारी अनुपमा गांगुर्डे , सहाय्यक कृषि अधिकारी सचिन गायकवाड , सामाजिक कार्यकर्ते सोमनाथ डोळे, सरपंच अशोक वाणी, राहुल वाणी, संजय वाणी, एकनाथ वाणी, या सह शेतकरी , यांनी कपाशी, बाजरी, मका आदी पिकांची स्थिती आणि झालेल्या नुकसानीची नोंद घेतली. तहसीलदार धीरज मांजरे , तालुका कृषी अधिकारी बोडखे मॅडम , मंडलाधिकारी जाफर पठाण, यांच्या नेतृत्वाखाली कृषी,महसूल विभागाच्या पथकाने शेतशिवारात जाऊन प्रत्यक्ष पाहणी केली.

यावेळी उपस्थित परिसरातील शेतकऱ्यांसोबत चर्चा करून कोणत्या पिकाचे किती क्षेत्र बाधित आहे, पिकांची सद्यस्थिती काय आहे? नुकसानीचे प्रमाण किती आहे? याबाबत सविस्तर माहिती संकलित करण्यात येत असून ही नोंद शासनाच्या मदत व पुनर्वसन विभागाच्या निकषांनुसार करण्यात येणार असल्याचे सांगण्यात येत आहे.

वास्तविक पाहता भर उन्हात सदरचे पंचनामे सुरू झाले असून शेतकऱ्यांना मदतीची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## एकही पात्र शेतकरी मदतीपासून वंचित राहू नये : आ. आशुतोष काळे



**प्रतिनिधी। नगरी समाचार**

**कोळपेवाडी :** कोपरगाव मतदारसंघ दुष्काळग्रस्त जाहीर झाला असून ट्रिगर-१ लागू करण्यात आला आहे. त्याअनुषंगाने सुरू असलेले पीक नुकसानीचे पंचनामे वेगाने, अचूक व पारदर्शकपणे पूर्ण करून शासनाकडून मिळणारी जास्तीत जास्त मदत शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवा, अशा सूचना आमदार आशुतोष काळे यांनी प्रशासनाला दिल्या.

पंचनाम्यांच्या प्रक्रियेचा आढावा घेण्यासाठी गुरुवारी (दि. १) आमदार काळे यांनी तहसीलदार महेश सावंत, तालुका कृषी अधिकारी मनोज सोनवणे तसेच पीक विमा कंपनीच्या प्रतिनिधींसोबत बैठक घेतली. पंचनाम्यांमध्ये कोणतीही त्रुटी राहू नये. पीक विमा घेतलेल्या शेतकऱ्यांचे वस्तुनिष्ठ पंचनामे करून अहवाल तातडीने विमा कंपनीकडे सादर करावेत, असे त्यांनी सांगितले.

ई-पीक पाहणी झालेली असो अथवा नसो, बाधित पिकांचे प्रत्यक्ष शेतात जाऊन पंचनामे करावेत. प्रत्येक बाधित क्षेत्राची अचूक नोंद घेऊन एकही पात्र शेतकरी शासनाच्या मदतीपासून वंचित राहणार नाही, याची दक्षता घ्यावी, असेही त्यांनी स्पष्ट केले.

दुष्काळामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडला असून रब्बी हंगामावरही त्याचा परिणाम होत आहे. त्यामुळे पंचनामे युद्धपातळीवर पूर्ण करून शासनाची मदत व पीक विम्याचा लाभ पात्र शेतकऱ्यांना मिळवून द्यावा, असे आवाहन काळे यांनी केले. शेतकऱ्यांनीही नुकसानीची नोंद वेळेत करून पंचनामा झाल्याची खात्री करावी, असे त्यांनी सांगितले.

## अशोक कारखान्यावर प्रशासकीय मंडळाची टांगती तलवार

### उच्च न्यायालयाचे निर्देश; २३ नोव्हेंबरपर्यंत प्रादेशिक संचालक घेणार निर्णय

**प्रतिनिधी। नगरी समाचार**

**श्रीरामपूर :** अशोक सहकारी साखर कारखान्याच्या आर्थिक कारभारावरून सुरू असलेल्या वादाला आता न्यायालयीन वळण मिळाले आहे. कारखान्यावर प्रशासकीय मंडळ नियुक्त करण्याची मागणी करणाऱ्या शेतकरी संघटनेच्या याचिकेवर मुंबई उच्च न्यायालयाच्या छत्रपती संभाजीनगर खंडपीठाने प्रादेशिक संचालक (साखर), अहिल्यानगर यांना आठ आठवड्यांत निर्णय घेण्याचे निर्देश दिले आहेत. त्यामुळे येत्या २३ नोव्हेंबरपर्यंत होणाऱ्या निर्णयाकडे कारखाना कार्यक्षेत्रातील सभासद, ऊस उत्पादक आणि कामगारांचे लक्ष लागले आहे.

शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष अनिल औताडे यांनी गुरुवारी श्रीरामपूर येथील शासकीय विश्रामगृहात आयोजित पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. यावेळी ड. विजय औताडे, जितेंद्र भोसले, युवराज जगताप, निलेश शेंडगे, बाळासाहेब उंडे, शरद पवार, अशोक टेकाळे यांच्यासह संघटनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

न्यायमूर्ती नितीन बी. सूर्यवंशी व न्यायमूर्ती आबासाहेब शिंदे यांच्या खंडपीठाने २३ सप्टेंबर २०२६ रोजी हे निर्देश दिले. न्यायालयाने अशोक कारखान्यावर थेट प्रशासकीय मंडळ नियुक्त करण्याचा आदेश दिलेला नसून, याचिकेत उपस्थित करण्यात आलेले मुद्दे, उपलब्ध कागदपत्रे आणि संबंधित नोंदी तपासून सक्षम प्राधिकरणाने कायद्यानुसार निर्णय घ्यावा, असे स्पष्ट केले आहे.

अशोक कारखान्याने राष्ट्रीय सहकार विकास महामंडळाच्या (एनसीडीसी) योजनेतून राज्य शासनाच्या हमीवर खेळत्या भांडवलासाठी कर्ज घेतले आहे. या कर्जाच्या परतफेडीच्या अटींचे पालन न झाल्याने थकबाकी निर्माण झाल्याचा दावा शेतकरी संघटनेने केला आहे. संघटनेच्या म्हणण्यानुसार, ३१ मार्च २०२६ अखेर एनसीडीसी कर्जापोटी सुमारे ३ कोटी ४७ लाख रुपयांची थकबाकी होती. शासन निर्णयातील तरतुदींनुसार कर्ज थकीत राहिल्यास संबंधित संचालक मंडळावर कारवाई करून प्रशासकीय मंडळ नियुक्त करण्याची तरतूद असल्याचा दावा संघटनेने केला आहे.

तक्रारीनंतर उच्च न्यायालयात धाव शेतकरी संघटनेने २४ ऑगस्ट २०२६ रोजी प्रादेशिक सहसंचालक (साखर), अहिल्यानगर यांच्याकडे कारखान्याच्या कारभाराबाबत तक्रार केली होती. या तक्रारीनंतर द्वितीय लेखापरीक्षकाची नियुक्ती करून अहवाल मागविण्यात आल्याचे संघटनेने सांगितले. मात्र, पुढील कारवाईला विलंब होत असल्याचा आरोप करत संघटनेने ३ सप्टेंबर रोजी उच्च न्यायालयात याचिका दाखल केली. या याचिकेवरील सुनावणीनंतर न्यायालयाने संबंधित विभागाला आठ आठवड्यांच्या कालावधीत निर्णय घेण्याचे निर्देश दिले आहेत. शेतकरी संघटनेच्या दाव्यानुसार, अशोक कारखान्यावर अहिल्यानगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे सुमारे २८० कोटी, एनसीडीसीचे १०४ कोटी आणि कामगारांची सुमारे १३ कोटी रुपये अशी एकूण सुमारे ३९७ कोटी रुपयांची देणी आहेत.

कारखान्याची आर्थिक स्थिती, मालमत्तेचे मूल्यांकन, संचित तोटा आणि कर्जाचा वाढता भार यांची चौकशी करण्याची मागणीही संघटनेने केली आहे.

कारखान्याच्या आर्थिक स्थितीबरोबरच ऊस उत्पादक आणि कामगारांच्या प्रश्नांवरही संघटनेने आक्षेप नोंदविले आहेत. २०२४-२५ आणि २०२५-२६ या हंगामांत उपलब्ध झालेल्या उसाच्या तुलनेत गाळप कमी झाले, असा संघटनेचा दावा आहे. तसेच अन्य कारखान्यांच्या तुलनेत ऊस उत्पादकांना कमी दर मिळाल्याचा आरोपही करण्यात आला. कामगारांचे वेतन दोन वर्षांपासून थकीत असल्याचा दावा करत संघटनेने कामगारांमध्ये नाराजी असल्याचे म्हटले आहे.

२३ नोव्हेंबरकडे श्रीरामपूरचे लक्ष अशोक कारखाना आर्थिक अडचणीतून बाहेर काढण्यासाठी प्रशासकीय मंडळ नियुक्त करावे, अशी मागणी शेतकरी संघटनेने केली आहे.

दरम्यान, या आरोपांबाबत कारखाना प्रशासनाची स्वतंत्र भूमिका अद्याप समोर आलेली नाही.

उच्च न्यायालयाच्या निर्देशानंतर आता प्रादेशिक संचालक (साखर), अहिल्यानगर यांच्याकडून होणाऱ्या निर्णयाकडे श्रीरामपूर तालुक्यातील सहकार क्षेत्राचे लक्ष लागले आहे. त्यामुळे २३ नोव्हेंबर हा दिवस अशोक कारखान्याच्या पुढील वाटचालीच्या दृष्टीने महत्त्वाचा ठरण्याची शक्यता आहे.

## शिर्डीत वाहतुकीसाठी प्रशासनाची नवीन आचारसंहिता

### १५ दिवसांत शहर होणार वाहतूक कोंडीमुक्त

**प्रतिनिधी। नगरी समाचार**

**शिर्डी ;** शहरात रिक्षांची वाढती गर्दी आणि अस्ताव्यस्त पार्किंगमुळे होणारी वाहतूक कोंडी रोखून वाहतूक व्यवस्था शिस्तशीर व सुरळीत करण्यासाठी प्रशासनाने हे महत्त्वपूर्ण पाऊल उचलले असून शिर्डीतील गर्दीची ठिकाणे आता मोकळा श्वास घेण्याची चिन्हे निर्माण झाली आहे .

या नवीन आचारसंहितेनुसार शिर्डीत प्रभावी उपाययोजना राबवल्या जात आ-हेत. शहरात दोन ठिकाणी अधिकृत पार्किंग व्यवस्था करण्यात आली असून, प्रवाशांची गैरसोय टाळण्यासाठी शहरातील ठराविक ४-५ ठिकाणी एका वेळी फक्त एकच रिक्षा उभी राहील. ती भरून गेल्यानंतरच दुसरी रिक्षा त्या ठिकाणी येईल आणि उर्वरित सर्व वाहने पार्किंगमध्येच थांबतील. नियम मोडणाऱ्या किंवा सहकार्य न करणाऱ्या चालक-मालकांचे थांबे कायमस्वरूपी बंद केले जातील आणि त्यांच्यावर कठोर कायदेशीर कारवाई केली जाईल.

पुढील १५ दिवस शहरात आरटीओचे विशेष पथक कार्यरत राहणार असून, जुनी वाहने किंवा कागदपत्रांची पूर्तता नसलेल्या वाहनांवर दंडात्मक व कायदेशीर कारवाई केली जाईल. तसेच, साईभक्तांना मोफत किंवा पेड पार्किंगची माहिती सहज मिळावी यासाठी ठिकठिकाणी क्यु आर कोड लावण्यात येणार आहेत. १० ते १२ जणांचे एम एस एक पथक नो-पार्किंग झोनमध्ये कारवाईसाठी तैनात असेल. नगरपरिषदेने नवीन टोइंग मशिन उपलब्ध केले असून, कारवाईच्या वेळी वाहन वेळेत न हलवल्यास २०० रुपये आणि टोइंग केल्यास ३००० रुपयांपर्यंत किंवा नियमांनुसार दंड आकारला जाईल. या सर्व उपाययोजनांमुळे पुढील १५ दिवसांत शिर्डी शहर पूर्णपणे वाहतूककोंडीमुक्त होणार असून, येथे येणाऱ्या साईभक्तांना मोठा दिलासा मिळणार आहे.

## निमगाव खैरी येथे शाळा व्यवस्थापन समितीची बिनविरोध निवड

### अध्यक्षपदी गणेश तरस व उपाध्यक्षपदी सोनाली साबळे



**प्रतिनिधी। नगरी समाचार**

**श्रीरामपूर :** तालुक्यातील निमगाव खैरी येथील निमगाव जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत शाळा व्यवस्थापन समितीच्या पुनर्गठनासाठी नुकताच पालक मेळावा उत्साहात संपन्न झाला.यावेळी सुरुवातीला प्रास्ताविकात मुख्याध्यापक संतोष वाघमोडे यांनी शाळा व्यवस्थापन समिती रचना व कार्य यासंदर्भात सर्वांना माहिती दिली.

त्यानंतर पालक मेळाव्यात शाळा व्यवस्थापन समिती पुनर्गठनाबाबत चर्चा होऊन सर्व पालकांनी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष,उपाध्यक्ष व सर्व सदस्यांची बिनविरोध निवड केली.

शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षपदी गणेश तरस, उपाध्यक्षपदी सोना-ली साबळे, सदस्यपदी पूजा कालंगडे, जयश्री भागडे, अर्चना जिवरख, अर्चना भागडे, राजश्री भागडे, पूजा धुळगंड, प्रियंका केदार, सोनाली रणनवरे, छाया धुळगंड, सचिन पवार, दत्तू बत्तीसे, अनिल आगल-वे, कृष्णा कालंगडे, तसेच माजी विद्यार्थी दत्तात्रय सगम यांची शिक्षणतज्ञ या पदावर सर्वानुमते बिनविरोध निवड करण्यात आली.

यावेळी शाळा व्यवस्थापन समितीचा शाळेच्या सर्वांगीण विकासासाठी महत्त्वाचा सहभाग असतो यावर चर्चा करण्यात आली.

गेल्या वर्षभरात शाळा व्यवस्थापन समितीच्या सहकार्याने शाळेत विद्या-र्थी गुणवत्तेसाठी व शाळा विकासासाठी अनेक उपक्रम यशस्वी झाल्याबद्दल सर्वांचे अभिनंदन करण्यात आले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेचे मुख्याध्यापक संतोष वाघमोडे, शिक्षिका प्रतिभा तोरणे,मीना निकम,सुधा गमे यांनी प्रयत्न केले.पालक मेळाव्यास सुजित भागडे, महेंद्र साबळे, निखिल सदाफळ, अफसर शेख, गुलाब शेख, यो-गेश नानेकर, प्रमिला दुशिंग, पूनम वाघ, अश्विनी पवार, अनिता गजहंस, मीना तुपे, नंदा पंडित, सुनंदा कालंगडे, अश्विनी पवार, योगिता तरस, अनिता तरस, जयश्री जाधव, अनिता झुराळे, वर्षा साठे, रुकैय्या शेख, उषा कांबळे, मीनाक्षी भोसले आदी पालक बहुसंख्येने उपस्थित होते.

शाळा व्यवस्थापन समितीची बिनविरोध निवड झाल्याबद्दल निमगाव खैरी येथील सर्व पालक व ग्रामस्थांनी कौतुक व अभिनंदन केले.शेवटी सुधा गमे यांनी सर्वांचे आभार मानले.

# बिझनेस एक्स्पोमधून विकसित भारताची पायाभरणी : ना.विखे पाटील

## १७५ स्टॉलमधून विद्यार्थ्यांच्या व्यावसायिक दृष्टिकोनाचे कौतुक

**प्रतिनिधी। नगरी समाचार**

**लोणी :** प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या माध्यमातून गेल्या तीन वर्षांपासून राबविण्यात येत असलेला 'बिल्डिंग प्रवरा' उपक्रम विद्यार्थ्यांना नवा आत्मविश्वास देणारा आणि विकसित भारताची पायाभरणी करण्यासाठी उपयुक्त करेल असे प्रतिपादन जलसंपदा तथा पालक मंत्री ना.राधाकृष्ण विखे पाटील केले.

लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या वतीने 'बिल्डिंग प्रवरा' संकल्पनेतून विद्यार्थ्यांच्या सहभागाने आयोजित करण्यात आलेल्या बिझनेस एक्सोला मंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि माजी मंत्री अण्णासाहेब म्हस्के पाटील यांनी भेट देऊन विद्यार्थ्यांच्या उपक्रमाच कौतुक केले.संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ सुस्मिता विखे पाटील यांच्या

**प्रवेशद्वारावरील देखावे ठरले आकर्षण....**
**बिझनेस एक्स्पोच्या प्रवेशद्वारावर पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांचा जीवनपट साकारण्यात आला असून हा देखावा लक्षवेधी ठरत आहे. तसेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'विकसित भारत' संकल्पनेवर आधारित 'विकसित प्रवरा' हा देखावाही प्रदर्शनाला भेट देणाऱ्यांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.**

संकल्पनेतून सलग तिसर्या वर्षी विद्यार्थ्याचा बिझनेस एक्स्पो आयोजित करण्यात आला आहे.

प्रवरा अभिमत विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. व्ही. एन. मगरे, ट्रक वाहतूक संस्थेचे चेअरमन नंदूशेठ राठी, सुनील जाधव, सहसचिव भारत घोगरे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. शिवानंद हिरेमठ, डॉ. प्रदीप दिघे,सौ.



लिलावती सरोदे डॉ. उत्तमराव कदम, डॉ. महेश खर्डे,डॉ. आर. ए. पवार यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

या बिझनेस एक्स्पोमध्ये सुमारे १७५ स्टॉल उभारण्यात आले आहेत.रंगीबेरंगी आणि आकर्षक असे फिश आणि फिश टँक आणि या फिश टँक ला सौरऊर्जा, स्वदेशी उत्पादने, अन्नतंत्रज्ञान, सेंद्रिय उत्पादने, इलेक्ट्रॉनिक वस्तू, खाद्यपदार्थ, हस्तकला, सजावटीच्या वस्तू यांसह विविध उत्पादनांचे विद्यार्थ्यांनी प्रदर्शन व विक्री केली आहे. दिवाळीच्या पार्श्वभूमीवर पणत्या, रांगोळ्या, कपडे, सजावटीचे साहित्य, सेंद्रिय उदबत्त्या, धूप तसेच विविध घरगुती उत्पादने, विविध खाद्यपदार्थांची रेलचेल विविध गेम्स ग्राहकांचा प्रतिसाद मिळत आहे.

कृषी शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी फळभाज्या, फुलझाडे व विविध रोपांच्या विक्रीला प्राधान्य दिले आहे. सेंद्रिय गूळ, गावरान तूप, दूध उत्पादनासाठी उपयुक्त खाद्यपदार्थ तसेच घरगुती व्यवसायातून तयार केलेल्या वस्तूंनाही ग्राहकांची पसंती मिळत आहे. बिझनेस एक्स्पोच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी केवळ उत्पादनांची विक्री न करता त्यामागील संकल्पना, बाजारपेठेचा अभ्यास, ग्राहकांची गरज आणि विपणन कौशल्य यांचेही दर्शन घडविले. ना. राधाकृष्ण विखे पाटील यांनी प्रत्येक स्टॉलला भेट देऊन विद्यार्थ्यांशी संवाद साधला. उत्पादनाची संकल्पना, बाजारपेठ, विक्रीचे नियोजन आणि भविष्यातील व्यवसायाच्या संधी याबाबत त्यांनी विद्यार्थ्यांकडून माहिती घेतली. काही स्टॉलवरील उत्पादनांची स्वतः खरेदीही त्यांनी केली.

सलग तिसऱ्या वर्षी आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमाबद्दल ना. विखे पाटील यांनी आयोजन समितीचे अभिनंदन केले. विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग आणि त्यांच्या व्यवसाय संकल्पना अभ्यासपूर्ण असल्याचे त्यांनी नमूद केले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आत्मनिर्भर भारत आणि स्वदेशी उत्पादनांना प्रोत्साहन देण्याचे आवाहन केले आहे. स्थानिक पातळीवर उत्पादित होणाऱ्या वस्तूंना बाजारपेठ उपलब्ध करून देण्याची दिशा या बिझनेस एक्स्पोमधून दिसून येत असल्याचेही ना. विखे पाटील यांनी सांगितले.

रविवार पर्यंत सुरू असणाऱ्या बिल्डिंग प्रवरा या उपक्रमा मध्ये सर्वांनी सहभागी होऊन विद्यार्थ्यांना प्रोत्साहन द्यावे असे आवाहन डॉ.सुस्मिता विखे पाटील यांनी केले आहे.

---

## देवळाली प्रवरा - प्रसादनगरचा अनेक वर्षांचा प्रलंबित प्रश्न सोडविणेसाठी ढूस व थोरात यांनी घेतली केंद्रीय मंत्री आठवले यांची भेट

**प्रतिनिधी। नगरी समाचार**

**अहिल्यानगर :** देवळाली प्रवरा नगरपरिषद हद्दीतील प्रसादनगर गट क्र. ५४२ या ४१७ आर जागेचा प्रश्न अखेर केंद्राच्या दारात पोहोचला आहे. या जागेवर ५० वर्षांपासून जवळपास २५० गरीब कुटुंबे राहत असून, नगरपरिषदेच्या नगरसेविका सौ. पल्लवी वैभव ढुस यांचे वतीने सामाजिक कार्यकर्ते आप्पासाहेब ढूस व आर पी आय जिल्हा अध्यक्ष सुरेंद्र थोरात यांनी आज पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सभागृह, सर्किट हाऊस, अहिल्यानगर येथे केंद्रीय सामाजिक न्याय मंत्री मा. रामदास आठवले साहेब यांच्याकडे प्रसादनगर च्या नागरिकांसाठी केंद्रातून झच-ध-ण २.० योजना मंजूर करावी अशी मागणी केली आहे.

ढूस यांनी ना. आठवले साहेब यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की,



प्रसादनगर च्या गट क्र. ५४२ मधील सदर ४१७ आर चौ. मी. जागा डॉ. बा. बा. तनपुरे सहकारी साखर कारखान्याच्या मालकीची आहे. शासनाने तेथे स्लम (झोपडपट्टी) घोषित केले असून त्या जागेत डउ, डढ, भटके, ऊसतोड कामगार समाजातील असे जवळपास तब्बल २५० कुटुंबे तेथे ५० वर्षांपासून राहत आहेत.

आजवर या ठिकाणी नगरपरिषदेने शासकीय निधीतून रस्ते, गटार, पथदिवे या मूलभूत सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. त्यामुळे सदर जागा कारखान्याला मोकळी करणे किंवा विक्री करणे शक्य नाही.

दि. ३०/०९/२०२६ रोजी झालेल्या कारखान्याच्या ६९ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत सभासद श्री. आप्पासाहेब भिमराज ढुस यांनी हा प्रश्न उपस्थित केला होता. त्यावर कायमस्वरूपी तोडगा म्हणून नगरपरिषदेच्या माध्यमातून झच-ध-ण २.० मधील खप-ीळीीं डश्रीी ठशवर्शीशश्रेशिपीं (-क्ष्झ/ इडउ घटक) योजना राबवावी व सदर जागा प्रसादनगरच्या रहिवाशांच्या नावे करावी, अशी मागणी ढूस यांनी केली आहे. या योजनेमुळे कारखान्याला केंद्राकडून जमिनीचा मोबदला मिळेल.., तसेच जवळपास २५० कुटुंबांना हक्काची जागा व पक्के घर मिळेल.. आणि, देवळाली प्रवरा नगरपरिषद डश्रीी ऋीशश होईल, असे ढूस यांनी दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे.

हा सामाजिक न्यायाचा प्रश्न आहे. केंद्राने विशेष बाब म्हणून हा प्रकल्प मंजूर करावा असे - सौ. पल्लवी वैभव ढुस, नगरसेविका यांचे वतीने आप्पासाहेब ढूस व सुरेंद्र थोरात यांनी ना. आठवले साहेब यांचेशी चर्चा करताना आग्रह धरला.

---

### आबांच्या शब्दांची आठवण व्हायरल; आश्वीतील पोलिसांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह

## पोलीस ठाण्याची पायरी चढताना मनात भीती नको

**प्रतिनिधी। नगरी समाचार**

**झरेकाठी :** पोलीस ठाण्याची पायरी चढताना मनात भीती नको, हक्क हवा! आणि गावातील वाद गावातच मिटवा... असा थेट, ग्रामीण ढंगातील संवाद साधत तत्कालीन गृहमंत्री स्व. आर. आर. पाटील (आबा) यांनी १३ मार्च २०१४ रोजी आश्वी पोलीस ठाण्याच्या उद्घाटनप्रसंगी आश्वीकरांशी संवाद साधला होता. त्यांच्या याच शब्दांची आठवण करून देणारे फलक आश्वी बु।। येथील बाजारतळ तसेच अम्रेश्वर महादेव मंदिर परिसरात काही जागरूक तरुणांनी रात्री लावले आहेत. हे फलक सध्या सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत असून, बारा वर्षांनंतर आबांच्या त्या संदेशाची पुन्हा चर्चा सुरू झाली आहे. आबांनी उद्घाटनावेळी मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या नागरिकांकडे पोलिसांवरील विश्वासाचे प्रतीक म्हणून पाहिले होते. अन्याय झाल्यास सर्वसामान्य नागरिकाने कोणतीही भीती न बाळगता पोलिसांकडे हक्काने जावे, गरिबातील गरीब व्यक्तीलाही सन्मानाची वागणूक मिळावी आणि पोलीस व जनता यांच्यात विश्वासाचे नाते निर्माण व्हावे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली होती. अवैध धंदे, गुंडगिरी आणि महिलांच्या सुरक्षिततेच्या प्रश्नांवरही त्यांनी भाष्य केले होते. त्याचबरोबर पोलीस प्रशासनासोबत नागरिकांनीही सहकार्य करणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले होते. आज पुन्हा का चर्चेत आला आबांचा संदेश? आबांच्या भाषणाची आठवण करून देणारे हे फलक अशा वेळी समोर आले आहेत, जेव्हा आश्वी पोलीस ठाण्याच्या कार्यक्षेत्रातील कथित अवैध धंदे, नागरिकांच्या तक्रारी आणि गणेशोत्सवातील मिरवणुकीदरम्यान पोलिसांच्या वर्तनाबाबत विविध प्रश्न उपस्थित होत आहेत. त्यामुळे हा फलक केवळ जुन्या आठवणी जागवणारा ठरला नसून, आजच्या परिस्थितीशी त्याची सांगड घातली जात आहे. अवैध धंद्यांबाबत नागरिकांचे सवाल आश्वी परिसरात विविध प्रकारचे अवैध व्यवसाय सुरू असल्याच्या तक्रारी आणि वृत्ते अलीकडच्या काळात समोर आली आहेत. यापूर्वीही आश्वी परिसरात अवैध दारूविक्रीविरोधात कारवाई झाल्याच्या बातम्या प्रसिद्ध झाल्या आहेत. त्यामुळे नागरिकांकडून एक प्रश्न उपस्थित केला जात आहे-अवैध धंद्यांबाबत तक्रारी होत असतील, तर त्यावर सातत्याने आणि निष्पक्षपणे कारवाई होणे आवश्यक नाही का? गणेशोत्सवातील पोलिसांच्या भूमिकेवरही चर्चा यंदाच्या गणेश विसर्जन मिरवणुकीदरम्यान काही गणेश मंडळांनी पोलिसांच्या वर्तनाबाबत आक्षेप घेतल्याचे वृत्त समोर आले. मिरवणुकीत वेळेचे पालन आणि कायदा-सुव्यवस्था राखणे ही पोलिसांची जबाबदारी असली, तरी उत्सव साजरा करणाऱ्या तरुण मंडळांशी संवाद आणि समन्वयातून वातावरण सकारात्मक ठेवणेही महत्त्वाचे आहे. याच पार्श्वभूमीवर आबांनी २०१४ मध्ये मांडलेल्या 'विश्वासाच्या पोलिस ठाण्या'च्या संकल्पनेची पुन्हा आठवण होत आहे. 'पोलीस ठाणे भीतीचे की विश्वासाचे?' अवैध धंद्यांबाबतच्या तक्रारी असोत, उत्सवातील तरुण मंडळांचे प्रश्न असोत किंवा सामान्य नागरिकांच्या सुरक्षिततेचा विषय असो-पोलीस आणि नागरिक यांच्यातील संवाद व विश्वास अधिक मजबूत होणे गरजेचे आहे. आबांनी ज्या पोलीस ठाण्याच्या उद्घाटनावेळी नागरिकांना पायरी चढताना मनात भीती नको, हक्क हवा असा संदेश दिला होता, त्याच ठिकाणी आज नागरिकांना तक्रार घेऊन जाताना तितकाच विश्वास वाटतो का, हा प्रश्न सोशल मीडियावरील या फलकामुळे पुन्हा चर्चेत आला आहे. वरिष्ठ पोलिस प्रशासनाकडून अपेक्षा आश्वी परिसरातील अवैध धंद्यांबाबतच्या तक्रारी, गणेशोत्सवातील मंडळांचे आक्षेप आणि पोलिसांच्या कार्यपद्धतीबाबत सुरू झालेली चर्चा याची वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांनी वस्तुनिष्ठ दखल घ्यावी, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

---

## एनडीआरएफच्या आधी राज्य सरकार शेतकऱ्यांना भरघोस मदत करणार : मंत्री ना.विखे पाटील

**प्रतिनिधी। नगरी समाचार**

**लोणी :** निवडणूक आयोगाच्या विरोधात ठाकरे बंधूंचे आंदोलन म्हणजे गमावलेली पक्षाची पत पुन्हा मिळवण्यासाठी सुरू केलेली केविलवाणी धडपड आहे; जे केजरीवाल बोलतात तेच सीजेपी बोलत असल्याने हे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विरोधात पुरस्कृत केलेले आंदोलन आहे, अशी टीका जलसंपदा तथा पालकमंत्री ना.राधाकृष्ण विखे पाटील यांनी केली.

माध्यमांशी बोलताना मंत्री विखे पाटील म्हणाले की, दिल्लीतील आंदोलनानंतर संपूर्ण देशात लोकप्रियता वाढेल, असा सीजेपीचा झालेला भ्रम आता दूर झाला असेल. जे केजरीवाल बोलतात तेच सीजेपीचे आंदोलक बोलतात.

त्यामुळे हे पुरस्कृत केलेले आंदोलन फक्त पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भारतीय जनता पक्षाला बदनाम करण्यासाठीच सुरू असल्याचे विखे पाटील म्हणाले.

आंदोलनात वेळ घालवण्यापेक्षा सरकारच्या खांद्याला खांदा लावून मदत करण्यासाठी पुढे आलात, तर शेतकरी तुम्हाला दुवा देतील. पण यांना काहीच करायचे नाही. हे कोणतीही मदत शेतकऱ्यांना करू शकणार नाहीत. कोविडच्या संकटात शेतकऱ्यांना हे काही देऊ शकले नाहीत, तर आता काय देणार? असा सवाल मंत्री विखे पाटील यांनी केला.

दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि सर्व मंत्री बांधावर जाऊन शेतकऱ्यांना आधार देत आहेत. महायुती सरकार हे देणारे सरकार असल्याने शेतकऱ्यांना मदत करण्यात कुठेही कमी पडणार नाही. एनडीआरएफच्या आधी राज्य सरकार भरघोस मदत करेल, अशी ग्वाही मंत्री विखे पाटील यांनी दिली.

---

## राशीनच्या नवरात्रोत्सवासाठी प्रशासनाची नियोजन बैठक

**प्रतिनिधी। नगरी समाचार**

**राशीन :** राशीन येथील श्री जगदंबा देवी नवरात्रोत्सवाच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था तसेच विविध प्रशासकीय बाबींच्या नियोजनासाठी ५ /१०/२०२६ ऑक्टोबर रोजी दुपारी ४ वाजता श्री जगदंबा देवी मंदिरात नियोजन बैठक आयोजित करण्यात आली आहे.

श्री जगदंबा देवी पब्लिक ट्रस्टच्या अर्जाच्या अनुषंगाने तहसीलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी कर्जत रवि सात्वन यांनी संबंधित विभागांना बैठकीस उपस्थित राहण्याचे निर्देश दिले आहेत.

यंदाचा नवरात्रोत्सव ११ ते २५ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत होणार आहे. उत्सवादरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये तसेच कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये, यासाठी प्रशासनाकडून नियोजन करण्यात येणार आहे.

बैठकीस गटविकास अधिकारी, सार्वजनिक बांधकाम विभाग, पोलीस विभाग, महावितरण, एसटी महामंडळ, आरोग्य विभाग, महसूल विभाग, ग्रामपंचायत तसेच श्री जगदंबा देवी पब्लिक ट्रस्टचे अध्यक्ष व पुजारी यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित राहणार आहेत.

---

## प्रवरा अभिमत विद्यापीठ, लोणी येथे ३ ते ५ ऑक्टोबर दरम्यान राष्ट्रीय क्रिडा स्पर्धांचे आयोजन

**प्रतिनिधी। नगरी समाचार**

**लोणी :** प्रवरा इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस, लोणी या प्रवरा अभिमत विद्यापीठात वैद्यकीय महाविद्यालयांच्या राष्ट्रीय स्तरावरील क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. दि. ३ ते ५ ऑक्टोबर या तीन दिवसांच्या कालावधीत फुटबॉल, बास्केटबॉल, बॅडमिंटन, टेबल टेनिस आणि पॉवरलिफ्टिंग या विविध क्रीडा प्रकारांच्या स्पर्धा रंगणार आहेत. प्रवरा अभिमत विद्यापीठाचे विश्वस्त ध्रुव विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती क्रीडा संचालक डॉ. सुनील बुलार यांनी दिली.

या स्पर्धांचे उद्घाटन शनिवार, दि. ३ ऑक्टोबर रोजी सकाळी १० वाजता सरस्वती हॉल येथे श्री साईबाबा संस्थान ट्रस्ट, शिर्डीचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी भीमराज दराडे यांच्या हस्ते होणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रवरा अभिमत विद्यापीठाचे कुलपती डॉ. राजेंद्र विखे पाटील राहणार असून, कुलगुरू डॉ. व्ही. एन. मगरे आणि अधिष्ठाता डॉ. सतीश महाजन यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धांमध्ये विविध वैद्यकीय महाविद्यालयांतील विद्यार्थी सहभागी होणार आहेत. कर्नाटक, राजस्थान, गुजरात या राज्यांसह बेळगाव, बडोदा, कोल्हापूर, सांगली, कराड, पुणे, छत्रपती संभाजीनगर, नागपूर, जळगाव, अहिल्यानगर आणि मुंबई आदी शहरांतील वैद्यकीय महाविद्यालयांच्या संघांनी स्पर्धेत सहभाग नोंदविला आहे. तीन दिवस चालणाऱ्या या स्पर्धांमुळे प्रवरा परिसरात क्रीडाप्रेमींना राष्ट्रीय स्तरावरील खेळाडूंच्या कौशल्याचा थरार अनुभवता येणार आहे. स्पर्धेची जय्यत तयारी पूर्ण झाली असून, सहभागी संघांचे स्वागत आणि स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी विद्यापीठ प्रशासन व क्रीडा विभाग सज्ज असल्याचे डॉ. सुनील बुलार यांनी सांगितले.

---

# शेवगावच्या हक्काच्या पाण्यावर गदा येणार नाही : मंत्री राधाकृष्णा विखे पाटील

## शेवगावनंतर पाथर्डीसाठी नवीन पाणी योजना; ताजनापूर टप्पा-३ साठी ५०० कोटींचा निधी देण्याची घोषणा

**प्रतिनिधी। नगरी समाचार**

**शेवगाव :** शेवगाव-पाथर्डी विधानसभा मतदारसंघातील दुष्काळी परिस्थिती आणि तीव्र पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर राज्याचे जलसंपदामंत्री तथा अहिल्यानगरचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या उपस्थितीत शुक्रवारी (दि. २) शेवगाव येथील लक्ष्मीनारायण मंगल कार्यालयात विशेष आढावा बैठक झाली. आमदार मोनिका राजीव राजळे यांच्यासह विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी, पदाधिकारी, शेतकरी व ग्रामस्थ बैठकीला उपस्थित होते.

टंचाईचे गांभीर्य लक्षात घेऊन अधिकाऱ्यांनी निष्काळजीपणा न करता युद्धपातळीवर उपाययोजना हाती घ्याव्यात. टंचाईच्या काळात जनतेला दिलासा देण्यासाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना कराव्यात. अधिकाऱ्यांनी मुख्यालय सोडू नये, अशा स्पष्ट सूचना विखे पाटील यांनी दिल्या.

टँकरच्या पाण्यावर फिल्टरची प्रक्रिया

टंचाईग्रस्त भागात टँकरद्वारे पुरवठा होणाऱ्या पाण्यावर फिल्टरची प्रक्रिया करून नागरिकांना पाणी देण्याचा निर्णय शासनाने घेतला असल्याचे विखे पाटील यांनी सांगितले. जनावरांना पाणी व चारा



तसेच नागरिकांना पिण्याचे पाणी याला प्राधान्य देण्याच्या सूचना त्यांनी प्रशासनाला दिल्या.

पाथर्डी तालुक्यात १३७ गावे असून त्यापैकी ५३ गावांमध्ये ६८ टँकर सुरू असल्याची माहिती तहसीलदार उद्धव नाईक यांनी बैठकीत दिली.

ताजनापूरच्या पुढील टप्प्यांना गती

शेवगाव तालुक्याला हक्काचे पाणी दिल्यानंतरच पाथर्डी तालुक्यासाठी नवीन पाणी योजना हाती घेण्यात येईल. त्यासाठी सुमारे ५०० कोटी रुपये खर्च अपेक्षित असून सर्वेक्षण करून कामाला प्राधान्य देण्यात येईल, असे विखे पाटील यांनी स्पष्ट केले.

ताजनापूर टप्पा क्रमांक एकमधील आठ गावांना पाणी देण्यासाठी ग्रामसभेचे ठराव घेण्यात येणार आहेत. टप्पा क्रमांक दोनमधून १३ गावांना शेतीसाठी पाणी देण्याचा मानस असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच ताजनापूर टप्पा क्रमांक तीन नव्याने हाती घेण्यात येणार असून त्यासाठी सुमारे ५०० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्याची घोषणा विखे पाटील यांनी केली.

शेवगाव तालुक्यातील पाणीप्रश्न सोडविण्यासाठी आपण सातत्याने प्रयत्नशील आहोत. मी जलसंपदा मंत्री असूनही माझ्यावर शेवगावकरांचा विश्वास नाही का? असा सवाल करत, शेवगाव तालुक्याला हक्काचे पाणी मिळवून देण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी सांगितले. जलजीवन मिशनच्या कामांबाबत बैठकीत नाराजी व्यक्त करण्यात आली. निकृष्ट अथवा बोगस कामे आढळल्यास संबंधित ठेकेदारांकडून पैसे वसूल करण्याच्या सूचना देण्यात आल्या. पाणी योजनांच्या पाइपलाइन फोडणाऱ्यांवर फौजदारी गुन्हे दाखल करण्याचे निर्देशही विखे पाटील यांनी दिले.

बैठकीस ताजनापूर प्रकल्पाचे कार्यकारी अभियंता जगदीश पाटील, मुख्या अभियंता गणेश हासे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, जिल्हा कृषी अधीक्षक सुधाकर बोराळे, उपजिल्हाधिकारी हिंगे, जलसंपदा विभागाच्या सुनंदा जगताप, सायली पाटील, प्रांताधिकारी प्रसाद मते, तहसीलदार आकाश दहाडदे, पाथर्डी तहसीलदार उद्धव नाईक, शेवगाव गटविकास अधिकारी महेश दहिफळे, पाथर्डीचे गटविकास अधिकारी धस, उपअभियंता कुलकर्णी, शेवगाव तालुका कृषी अधिकारी अंकुश जोगदंड, पाथर्डी नगरपरिषदेचे मुख्याधिकारी संतोष लांडगे, शेवगाव नगरपरिषदेच्या मुख्याधिकारी विजया घाडगे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी व पदाधिकारी उपस्थित होते.